ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक

# ठाणेवैभव

इष्ट ते छापणार
संस्थापक : नरेंद्र बल्लाळ

३० जानेवारी २०१७, सोमवार . पृ . ०७

Vishwatmak Om Gurudev College of Engineering
Library

# ओम गुरुदेव अभियांत्रिकी कॉलेजात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**कसारा, दि. २९ (वार्ताहर) - आटगावजवळील तानसा परिसरात वसलेल्या 'विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्ट'च्या ओम गुरुदेव अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये 'आत्मा आविष्कार-२०१७' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन नुकतेच कल्याण शहरातील आचार्य अत्रे रंगमंदिरात अत्यंत थाटात पार पडले.**

संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव आणि प्रमुख पाहुणे साहेबराव चव्हाण यांच्या हस्ते हा उद्घाटन सोहळा झाला. यावेळी संस्थेचे सचिव, व्यवस्थापक, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आपले विविध कलागुण विकसित करावेत व खिलाडूवृत्तीने आयुष्यामध्ये पुढे जावे या उद्देशाने 'आत्मा आविष्कार-२०१७' या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयामध्ये दरवर्षी करण्यात येते. अभियांत्रिकी शिक्षण घेत असतानाच कला व ध्यान या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्ज्वल करावे आणि समाजात प्रेरणादायी ठरावे, अशी अपेक्षा उमेश जाधव यांनी यावेळी व्यक्त केली .कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी प्रतिनिधी समीर बसवंत व सुशांत कोठावदे, सांस्कृतिक प्रतिनिधी मनिष लिहे, तृप्ती सपट आणि इतर सहकारी विद्यार्थ्यांनी केले. तर प्रा.अमोल बाविस्कर, प्रा. वैभवी म्हात्रे आणि सहकाऱ्यांनी आयोजकांना उत्तम मार्गदर्शन केले.